# <u>नियमित दिवाणी मुकदमा नं.५५/२०१३ मधील निशाणी २१ वरील आदेश</u>

( CNR NO. MHRG14-000324-2013)

१. वादी याने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश–६, नियम–१७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी केला आहे.

२. वादीने सदर कामी अर्जात नमूद केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे दुरुस्ती मागितली आहे.

अ) दावा कलम '१२' चे शेवटी ''वर नमूद पत्र हे वादाकरीता नोटीस होती असे धरले, तर जोपर्यंत संपादनाची प्रक्रिया रदद होत नव्हती अथवा संपादन राहणार आहे किंवा कसे याबाबतच अंतिम निर्णय होत नव्हता, तोपर्यंत प्रतिवादी हे देखील व्यवहार पूर्ण करणार व कसे हे उत्तर देऊ शकत नव्हते व त्यामुळे वर नमूद केलेप्रमाणे वादीने देखील प्रतिवादींचे आश्वासनांवर काही काळ थांबण्याचे ठरविले होते.'' असा मजकूर टाकणे. तसेच

ब) दावा कलम १९ मध्ये दाव्यास कारण की, या शब्दानंतर ''दावा मिळकतीची संपादनाची प्रक्रिया रदद होवून देखील प्रतिवादी दावा मिळकतीचे खरेदीखत करुन देणेस टाळाटाळ करीत असल्याने'' असा मजकूर टाकणे.

३. सदर अर्जावर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल करुन जोरदार हरकत घेतली आहे व सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादीचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे व अभिलेख वाचून पाहीला. वादी व प्रतिवादींचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

५.  वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ आले आहेत. सदरचे मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्ज मंजूर होणेस पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत –**

६.  उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता वादींनी मागितलेली दावा दुरुस्ती ही दाव्यातील मुददे निश्चितीच्या पूर्वीची आहे. सदर कामी अदयाप मुददे निश्चित होवून पुरावा सुरु झालेला नाही. वादीचे असे कथन आहे की, दाव्याच्या प्रतिवादनांबाबत अधिक स्पष्टता येण्यासाठी वाढीव खुलासा व मजकूर दाव्यात नमूद करणे आवश्यक आहे. सदरचे कारण योग्य वाटते. सदर कामी दावा दुरुस्ती झाल्यास प्रतिवादीस पुन्हा जादा कैफियत देवून त्याबाबत म्हणणे मांडता येणार आहे. वादीच्या अनावधानाबाबत वादीवर दंड आकारुन सदर दुरुस्ती मंजूर करता येणे शक्य आहे. सदर दावा दुरुस्ती करु न दिल्यास उभय पक्षकारांचे वादातीत मुददे निश्चित करुन त्यावर योग्य न्यायनिर्णय होणार नाही. सबब, सदरची दावा दुरुस्ती मंजूर करणे योग्य होईल.

७.  वादीने त्याचे कथनाचे पुष्टयर्थ मा.सर्वोच्च न्यायालय व मा.मुंबई उच्च न्यायालयांच्या खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतला आहे.

१. गुरबख्श सिंग व इतर वि. बुटा सिंग व इतर, २०१८ ऑल एस.सी.आर. १२७४.

२. राजबहाददुर जियाराम यादव वि. प्रकाश उर्फ पप्पू जियाराम यादव व इतर, २०१६(१) ऑल एम.आर. ५५०

८.		उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा दावा दुरुस्ती अर्ज मंजूर झालेस दावा गुणदोषांवर न्यायनिर्णीत करणेस मदत होणार आहे. सदरचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादींचे नूकसान होणार नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून सदरची दावा दुरुस्ती मंजूर होणे न्यायोचित होणार आहे. तसेच वादीतर्फे दाखल करण्यात आलेले मा.सर्वोच्च व उच्च न्यायालयांच्या न्यायनिर्णयांचे अवलोकन केले असता सदरचे न्यायनिर्णय हे वादीचे अर्जास लागू होत आहेत. सबब, वरील विवेचनावरुन मी मुद्दा क्रमांक १ साठी होकारार्थी मत नोंदवत आहे व मुद्दा क्रमांक २ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

| | |
|---|---|
| १. | वादीचा अर्ज रु.२५०/– इतके खर्चावर मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | सदर खर्चाची रक्कम वादीने प्रतिवादी यांना पुढील तारखेचे आत द्यावी. |
| ३. | वादीने दाव्यामध्ये खर्चाची रक्कम भरल्यानंतर विहीत कालावधीत योग्य ती नियोजीत दुरुस्ती करावी. |
| ४. | वादीने दुरुस्त दाव्याची प्रत न्यायालयासाठी व प्रतिवादींसाठी दयावी. |

ठिकाण –उरण
दिनांक – १६.११.२०२१.

(निलेश एम.वाली )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उरण.